लातूर भूकंप
LATUR BHUKAMP
सांज दैनिक : रविवार - १७ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १६५
पाने - ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com
संपादक: अशोक चिंचोले
किंमत २ रूपये



# दहावी, बारावीच्या परीक्षांसाठी खासगी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यास ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

लातूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खासगीरित्या (फॉर्म नं. १७ भरून) प्रविष्ट होण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

या सुविधेनुसार विद्यार्थी २० सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२३ या काळात नावनोंदणी अर्ज आणि शुल्क ऑनलाईन भरू शकतील. तर २२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत विद्यार्थ्यांना मूळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करावे लागेल. माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याची पोचपावती एक छायाप्रत मूळ कागदपत्रे व यादी ५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

खाजगी विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी व इयत्ता बारावीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. इयत्ता दहावीसाठी http://form17.mh-ssc.ac.in Va B`Îmm ~mamdrgmR>r http://form17.mhAhsc.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच हे अर्ज भरावयाचे आहेत. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र, आधारकार्ड, स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो आवश्यक असून ऑनलाईन अर्ज भरताना कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे. संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेलवर पाठविली जाईल. तसेच संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहीत मुदतीत जमा करावीत.

खासगी विद्यार्थ्यांसाठी इयत्ता दहावीसाठी एक हजार रूपये नोंदणी शुल्क तर १०० रूपये प्रक्रिया शुल्क असेल तर इयत्ता बारावीसाठी ६०० रूपये नोंदणी शुल्क तर १०० रूपये प्रक्रिया शुल्क असेल. इयत्ता दहावी, इयत्ता बारावी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यमनिहाय माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यापैकी विद्यार्थ्यांची पूर्वीची शाळा किंवा पत्त्यानुसार सर्वात जवळची शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे. या वर्षापासून संपर्क केंद्र पद्धत बंद करण्यात आली असल्याने मान्यताप्राप्त सर्व शाळांमधून खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज स्विकारणे अनिवार्य आहे.

इयत्ता दहावी व इयत्ता बारावी फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेसाठी प्रविष्ठ खाजगी विद्यार्थी फॉर्म न. १७ नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वतःकडे ठेवून त्याच्या दोन छायाप्रती माध्यमिक शाळेस, कनिष्ठ महाविद्यालयास देण्यात याव्यात. तसेच एकदा नावनोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नावनोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची असल्यास विद्यार्थ्यास पुन्हा नावनोंदणी शुल्क ऑनलाइन जमा करावे लागेल याची नोंद घ्यावी.

दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल, तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकाच्या अथवा प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. तसेच आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडून माहिती प्राप्त करून घ्यावी. अनलाईन अर्ज भरतांना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२०-२५७०५२०७/ २५७०५२०८/२५७०५२७१ वर संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.

पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. खाजगी विद्यार्थी नियमित शुल्काने नावनोंदणी करण्याकरिता अंतिम मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत असणार आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे पुणे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# स्वच्छता मोहीम ही चळवळ व्हावी : डॉ. ठोंबरे

## मेरी माटी मेरा देश उपक्रमांतर्गत श्रमदान कार्यक्रम



लातूर : मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने कृषि महाविद्यालय लातूर येथे १७ सप्टेंबर २०२३ रोजी भव्य ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार 'माझी माती माझा देश' व त्यानंतर स्वच्छता अभियान व श्रमदानाने कार्याक्रमाची सांगता झाली. निजामाच्या जुलमी राजवटीपासून मराठवाडा प्रांत दि:१७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झाला. सरदार वल्लाभभाई पटेल यांनी ऑपरेशन पोलो यशस्वीरीत्या राबवून हैद्राबाद प्रांत स्वतंत्र भारतात विलीन केला. त्या शुरांच्या बलिदानाचे स्मरण करण्याचा दिवस म्हणजेच मराठवाडा मुक्ती संग्राम दिन.

या निमित्ताने आज सकाळी कृषि महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परीषद, पुणे येथील संचालक शिक्षण प्रा.हेमंत पाटील, डॉ.विश्र्वनाथ कांबळे, डॉ.दिनेशसिंह चौहान हे उपस्थित होते. यानंतर 'मेरी माटी मेरा देश' या अभियानांतर्गत सर्व मान्यवरांनी मृदेचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे या हेतूने ओंजळीत मृदा घेवून विद्यार्थ्यांना अवलोकन करण्यास सांगितले. यामध्ये गाजरगवत निर्मुलन, प्लास्टिक मुक्ती, वृक्षसंवर्धन, घनकचरा व्यवस्थापन, तंबाखूमुक्त परिसर हे उपक्रम राबवले.यावेळी बोलताना डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, महात्मा गांधीजीच्या स्वच्छ भारताचे स्वप्न साकार व्हावे तसेच श्रमदानातून सामाजिक बांधिलकी जपावी व त्यांनी राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे या हेतूने सर्व कृषिच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात स्वच्छता अभियान व श्रमदान करावे. ते पुढे असेही म्हणाले स्वच्छता मोहीम ही चळवळ व्हावी. या श्रमदान मोहिमेत पाचशे विद्यार्थी - विद्यार्थीनी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे आयोजन जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. महाविद्यालयाचा परिसर व सर्व कार्यक्रम पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

सर्वांना अल्पोपहार वितरीत होताच विद्यार्थ्यांनी प्रस्थान केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.प्रशांत करंजीकर, डॉ.विलास टाकणखार,डॉ.विठोबा मुळेकर, डॉ.व्यंकट जगताप, डॉ.विजय भामरे, डॉ.राजेश शेळके, डॉ.अनंत शिंदे, डॉ.पद्माकर वाडीकर, डॉ.नितीन तांबोळी, डॉ.दयानंद मोरे,डॉ.सुनिता मगर, डॉ.प्रभाकर आडसूळ, डॉ.विनोद शिंदे,डॉ.ज्ञानेश्र्वर सुरडकर, डॉ.संघर्ष शृंगारे, श्री.भगवान कांबळे, यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी, शिक्षक वर्गीय, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बहुसंख्य उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढविली.



# डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडून माजी खा. डॉ. सुनील गायकवाड यांचा गौरव

पुणे : एम आय टीचे संस्थापक डॉ. प्रा. विश्वनाथ दा. कराड यांनी कोथरुड शैक्षणिक संकुलात लातूरचे लोकप्रिय, संसद रत्न, कार्यसम्राट माजी खा. प्रा. डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांचा स्मृती चिन्ह आणि मानाची शाल देऊन यथोचित गौरव केला.

डॉ. विश्वनाथ कराड यांनी माजी खासदार डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांनी २०१४ ते २०१९ या काळात केलेल्या कामाचे कौतुक करुन उच्च शिक्षित खासदार म्हणून केंद्र सरकारच्या अनेक विकास कामाच्या योजना आणि विशेष म्हणजे लातूर व नांदेड ला NEET परीक्षा केंद्र आणि पासपोर्ट सेवा केंद्र आणि रेल्वे बोगी कारखाना आणि सुपर स्पेशिलिटी हॉस्पिटल असे अनेक लोकोपयोगी काम केल्याबद्दल समाधान व्यक्त करुन पुढील काळासाठी डॉ सुनील गायकवाड यांना शुभेच्छा देऊन अत्यंत आनंदानी विद्यापीठ कॅम्पस मधे गौरव करुन शुभेच्छा दिल्या.

शिक्षक दिनाच्या निमित्य डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांनी लिहलेला राजभाषा किसे कहते है? आणि जनसेवक जमिनीशी नाळ असलेला नेता हे दोन ग्रंथ विश्वधर्मी शांतिदूत डॉ. विश्वनाथ कराड यांना देऊन त्यांचे आशीर्वाद डॉ सुनील गायकवाड यांनी घेतले.

या प्रसंगी विद्यापीठ चे रजिस्टार आणि अनेक अधिकारी उपस्थित होते.विशेष उपस्थित पाच पांडव यांच्या मातोश्री कुंती यांच्या परिवाराचे वंशज राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे राष्ट्रीय संपर्कप्रमुख डॉ. ब्रिजेश कुंतल, चोखामेळा साहित्य संमेलन प्रमुख संयोजक सचिन पाटील, भाजपाचे विस्तारक सिद्धेश्वर माने आदी मान्यवर उपस्थित होते.

# जळकोट, अहमदपूर येथील शासकीय वसतिगृहे आणि लामजना येथील निवासी शाळेच्या इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

लातूर : राज्य शासन गोरगरीब सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असून विद्यार्थ्यांनी शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर सामाजिक न्याय विभागाकडून लातूर जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या जळकोट आणि अहमदपूर येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या, तसेच लामजना येथील शासकीय निवासी शाळेच्या इमारतींच्या दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या लोकार्पणप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्यासह लातूरचे खा. सुधाकर शृंगारे, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. रमेश कराड, आ. अमित विलासराव देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. बाबासाहेब पाटील, आ. धीरज विलासराव देशमुख, आ. अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होत्या.

लातूर जिल्ह्यातील मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या दोन इमारती आणि शासकीय निवासी शाळेची एक इमारत या कामांसाठी इमारतीसाठी एकूण २९ कोटी ८६ लक्ष रुपये निधी आणि २ हेक्टर २० आर जमीन उपलब्ध करून देण्यात आली. या दोन वसतीगृहांमुळे २०० विद्यार्थीनींची निवास व भोजनाची व्यवस्था झालेली आहे. तसेच निवासी शाळेमुळे २०० मुलांची शिक्षणाची व निवासाची व्यवस्था झालेली आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना भोजन, निवास, गणवेश, क्रीडा साहित्य, ग्रंथालय आणि संगणक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांनी घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

सामाजिक न्याय विभाग राबवित असलेल्या विविध योजनांची मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी माहिती दिली. शासकीय तसेच अनुदानित वसतिगृहांच्या माध्यमातून एकूण दीड लाख विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व सामाजिक न्याय विभागासाठी करण्यात येत असलेली तरतुदीची माहिती दिली. तसेच मागासवर्गीय घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत विभागाचे सचिव सुमंत भांगे व विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण झालेल्या जळकोट येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या इमारतीसाठी ६० आर जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच बांधकामासाठी १० कोटी ८१ लक्ष रुपये निधी देण्यात आला होता. १०० विद्यार्थी संख्येच्या या वसतिगृहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मान्यता देण्यात आली होती. तसेच अहमदपूर येथील मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या बांधकामासाठी शासनाने ८ कोटी ५० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून दिला होता. या वसतिगृहाची विद्यार्थी क्षमताही शंभर विद्यार्थ्यांची आहे. औसा तालुक्यातील लामजना येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या निवासी शाळेसाठी १०० आर जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी १० कोटी ५५ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. २०० विद्यार्थी क्षमता असलेल्या या निवासी शाळेच्या इमारतीचेही आज मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

लातूर जिल्हा हे शैक्षणिक केंद्र असल्याने जिल्ह्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील सर्वाधिक २५ वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये मुलांची १३ आणि मुलींच्या १२ वसतिगृहांचा समावेश आहे. यामध्ये २ हजार ७९० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तसेच जिल्ह्यात सहा निवासी शाळा कार्यरत असून यामध्ये १ हजार २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

# हिप्परगा (रवा) येथे बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी अडीच कोटीचा निधी मंजूर-आ. सतीश चव्हाण

छत्रपती संभाजीनगर : हिप्परगा (रवा), ता.लोहारा, जि.धाराशिव येथे बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी रू.२.५० कोटीचा निधी देण्याचा निर्णय आज छत्रपती संभाजीनगर शहरात झालेल्या मंत्री मंडळ बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती आ.सतीश चव्हाण यांनी दिली. ५ सप्टेंबर रोजी आ.सतीश चव्हाण यांनी मंत्रालयात राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची भेट घेऊन सदरील बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी विशेष बाब म्हणून रू.२.५० अडीच कोटीचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. अखेर त्यांच्या मागणीला यश आले आहे.

हिप्परगा (रवा) हे गाव मराठवाडा मुक्ती संग्राम गरम चळवळीचे प्रमुख ठिकाण होते. स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९२१ साली येथे राष्ट्रीय शाळेची स्थापना करून अनेक स्वातंत्र्य योध्दे तयार करण्याचे काम केले. येथूनच मराठवाडा मुक्ती संग्रामाची बीजे पेरली गेली. मात्र प्रशासनाच्या उदासिनतेमुळे हे ठिकाण दुर्लक्षीत राहिले असल्याचे आ.सतीश चव्हाण यांनी अजित पवार यांच्या निदर्शनास आणून दिले होते. या ठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांनी व गावकर्यांनी मिळून एक स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणात व राष्ट्रीय शाळेची आठवण म्हणून एक स्मृतिस्तंभ बांधलेला आहे. १७ सप्टेंबर रोजी सांस्कृतिक कार्याक्रमासह या दिवशी विविध सामाजिक संघटना, स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारस त्या स्तंभास अभिवादन करण्यासाठी येतात. मात्र १७ सप्टेंबर हा कालावधी पावसाळी ऋतुत येत असल्यामुळे कार्यक्रम घेण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे आ.सतीश चव्हाण यांनी सांगितले होते.

मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास भावी पिढीला समजावा यासाठी याठिकाणी सांस्कृतिक सभागृह व म्युझियम/वस्तुसंग'हालय तसेच विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज असे ग्रंथालय व अभ्यासिका एकाच छताखाली व्हावी यासाठी जुन्या शाळेचे निर्लेखन करून ती जागा या इमारतीसाठी उपलब्ध झालेली आहे. अशा बहुउद्देशीय इमारतीसाठी विशेष बाब म्हणून रू.अडीच कोटीचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी आग्रही मागणी आ.सतीश चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली होती.

अखेर आ.सतीश चव्हाण यांच्या मागणीला यश आले असून आज झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत सदरील बहुउद्देशीय इमारत बांधकामासाठी २.५० कोटी रूपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदरील निर्णय घेतल्याबद्दल आ.सतीश चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, ना.देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

मराठवाडा मुक्तीसंग्रामात अमूल्य योगदान देणारे मातोळा (ता.औसा, जि.लातूर) येथील थोर स्वातंत्र्य सैनानी क्रांतीवीर दत्तोबा भोसले यांचे मातोळा येथे स्मारक उभारण्यासाठी रू.१ कोटीचा निधी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. क्रांतीवीर दत्तोबा भोसले यांचे स्मारक उभारण्यासाठी रू.१ कोटीचा निधी देण्याची मागणी आ.सतीश चव्हाण यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे केली होती.

# 'मिलेट रॅली'मधून सांगितले पौष्टिक तृणधान्यांचे महत्व

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्ये वर्षानिमित्त कृषि विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'मिलेट रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. यामाध्यमातून तृणधान्याचे महत्व पटवून देण्यात आले. जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शिवसांब लाडके यांच्या हस्ते या रॅलीचे उद्धाटन झाले.

कृषि उपसंचालक महेश क्षीरसागर, उपविभागीय कृषि अधिकारी दिलीप जाधव, राजेंद्र काळे, तालुका कृषि अधिकारी दिलीप राऊत, संजय गायकवाड, लक्ष्मण खताळ, नितीन कांबळे, संजय नाब्दे, संजयकुमार ढाकणे, अनिल शेळके यावेळी उपस्थित होते. मानवी आरोग्यासाठी बाजरी, राळा, नाचणी, राजगिरा, ज्वारी या तृणधान्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचे प्रत्येक आठवड्यातून किमान एकदा तरी या तृणधान्यांचे सेवन करावे, असे आवाहन श्री. लाडके यांनी यावेळी केले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरु झालेली रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे महात्मा गांधी चौक येथून परत जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे आल्यानंतर रॅलीचा समारोप झाला. प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ विविध तृणधान्यांचे महत्त्व पटवून देण्यारी रांगोळी साकारण्यात आलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. शहरातील सदानंद विद्यालय व केशवराज विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. जिल्ह्यातील कृषि व संलग्न विभागातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचलन कृषि पर्यवेक्षक सूर्यकांत लोखंडे यांनी केले, कृषि उपसंचालक महेश क्षीरसागर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर



नॅक पुनर्मानांकन "अ" दर्जा प्राप्त

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| कनिष्ठ विभाग | : | कला, वाणिज्य, विज्ञान, उ.मा. व्यवसाय अभ्यासक्रम शाखा |
| पदवी विभाग | : | बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., समाजकार्य, बीसीए |
| पदव्युत्तर विभाग | : | एम.ए. (इतिहास, भूगोल, तत्वज्ञान, राज्यशास्त्र, समाजशास्त्र) / एम.एस्सी. (गणित) |
| संशोधन केंद्र | : | भूगोल, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र |

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आणि

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त

५३ वर्षाची उज्ज्वल यशाची परंपरा असलेल्या

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातर्फे हार्दिक शुभेच्छा...!

: शुभेच्छुक :

(डॉ. राजकुमार लखादिवे)
उपप्राचार्य

(डॉ. संजय दुर्वासराव गवई)
प्रभारी प्राचार्य

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

# मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी...



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## मराठवाड्याचा कायापालट घडविणारा तब्बल ४६ हजार ५७९ कोटी ३४ लाख रुपयांचा संकल्प



## राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णय (दि.१६ सप्टेंबर २०२३)

### बळीराजाच्या कल्याणासाठी !

- मराठवाडयात मोठ्या प्रमाणावर जलसिंचन होणार. ११ प्रकल्पांना मान्यता. १३ हजार ६७७ कोटींचा सुधारित वाढीव खर्च मंजूर.
- परळी वैजनाथ येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय.
- सोयगाव तालुक्यात शासन अनुदानित कृषी महाविद्यालय. नांदेड येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय.
- परळी वैजनाथ येथे नवीन शासकीय कृषी व्यवसाय व
- व्यवस्थापन महाविद्यालय. अंबाजोगाई तालुक्यात लाल कंधारी, देवणी देशी गोवंशाचे जतन करणार.
- छत्रपती संभाजीनगर येथे भ्रुण प्रत्यारोपणासाठी
- फिरत्या प्रयोगशाळेचा उपक्रम.
- परळी वैजनाथ येथे सोयाबीन संशोधन प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र.
- सोयाबीन उत्पादनास गती येणार.

### सर्वोत्तम शिक्षणासाठी!

- समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात १० टक्के वाढ.
- राज्यातील शाळा आता दत्तक घेता येणार. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निर्णय.
- जालना येथे आयटीआय इन्क्युबेशन सेंटर स्थापणार. १० कोटीस मान्यता.

### आरोग्यम् धनसंपदा!

- हिंगोलीत नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय. ४८५ कोटी खर्चास मान्यता.
- राज्यातील वरिष्ठ निवासी डॉक्टर्सना ८५ हजार रुपये दरमहा मानधन. एकूण १२.८५ कोटी खर्च.
- धाराशिव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा.
- २००५ पूर्वी नियमित पदावर अस्थायी सेवेतील कार्यरत आणि २००९ मध्ये नियमित सेवेत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना मॅटच्या आदेशाचा लाभ.

### महिला सक्षमीकरणासाठी!

- राज्यात 'मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण' अभियान राबविणार.
- ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी १०७६ कोटींची वाढीव तरतूद.
- मराठवाड्यातील १२ लाखांपेक्षा जास्त महिलांना लाभ.

### सर्वांगीण विकासासाठी!

- गोर बंजारा समाजभवनासाठी नवी मुंबई येथे भूखंड देणार.
- सौर ऊर्जा कुंपणासाठी रक्कम थेट हस्तांतरित होणार.
- सिल्लोड येथे दिवाणी न्यायालय.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत ७५ महोत्सव



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

www.mahasamvad.in /MahaDGIPR /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

लातूर
भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
रविवार १७ सप्टेंबर २०२३



## नमो ११ कलमी कार्यक्रमाची घोषणा

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्य सरकारने नमो ११ कार्यक्रमाची घोषणा केल्याची माहिती मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

शासकीय योजनांचा लाभ, नमो कामगार कल्याण अभियान, नमो शेततळी अभियान, नमो आत्मनिर्भर आणि सौर गाव अभियान, नमो ग्राम सचिवालाय अभियान, आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, दिव्यांग शक्ती अभियान, क्रीडा मैदान व उद्यान अभियान, शहर सौंदर्यकरण अभियान, नमो तिर्थस्थळे व गड किल्ले संरक्षण कार्यक्रम, गरीब व मागासवर्गीय सन्मान अभियान आदी ११ कलमांचा यात समावेश आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज वाढदिवस. त्यांना उदंड आयुष्य लाभावे म्हणून आज लातूरच्या गंजगोलाई येथील आई जगदंबेस महाआरती करण्यात आले. यावेळी खा. सुधाकर शृंगारे यांच्यासह देवीदास काळे, शैलेश गोजमगुंडे, मीनाताई भोसले, अजित पाटील आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठवाड्याच्या विकासासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न

– ना. संजय बनसोडे

लातूर : सरकारने मराठवाड्याच्या विविध विकास योजनांसाठी ५९ हजार कोटी रूपयांच्या योजनेस मंजुरी दिली आहे. सरकार मराठवाडा विकासासाठी विशेष प्रयत्न करीत आहे, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांनी केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त हुतात्मा स्मारक येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमात उपस्थितांना शुभेच्छा देताना ते बोलत होते.

स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे कुटुंबिय, खा. सुधाकर शृंगारे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, नागरिक व पत्रकार यावेळी उपस्थित होते.

लातूर-टेंभूर्णी मार्ग, लातूर जिल्ह्यातील एमआयडीसी यासह विविध कामांच्या प्रस्तावांना मान्यता मिळाली असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. मराठवाडा मुक्तिसंग्रामात लातूरकरांचे योगदान खूप महत्वाचे आहे. या लढ्यात अनेकांनी बलिदान दिले. महाराष्ट्र परिषदेची महत्वाची दोन अधिवेशने लातूरमध्ये झाली. या भागात आर्य समाजाचा अधिक प्रभाव होता. औराद, निलंगा, होडोळी, बोटकुल, हत्तीबेट, रामघाट, अंबुलगा, तोंडचीर आणि घोणसी अशा अनेक ठिकाणी झालेल्या लढाईचा इतिहास सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्यासारखा आहे. मुक्तिसंग्रामात स्वातंत्र्य सैनिकांच्या निजाम व रझाकार यांच्याशी झालेल्या लढायांचे स्मरण व्हावे, यासाठी अशा लढाईच्या ठिकाणी स्मारक उभे करण्यात येत आहेत. तसेच रामघाटच्या प्रसिद्ध लढाईचे चीरस्मरण म्हणून त्याठिकाणी भव्य प्रवेशद्वार उभे केले जाणार आहे. यासाठी नुकतेच शासनाने सुमारे ९८ लक्ष रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

प्रारंभी क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांच्या हस्ते स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर पोलीस पथकाने हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून शस्त्र सलामी दिली. ना. बनसोडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. तसेच उपस्थितांना मराठवाडा भूमीला समृद्ध करण्यासाठी वचनबद्ध राहण्याची शपथ देण्यात आली. यावेळी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेवून ना. बनसोडे यांनी त्यांचा सत्कार केला. तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी, नागरिक, पत्रकार यांना मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन उद्धव फड यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या प्रथम तीन स्पर्धकांचा क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानामध्ये सहभागी होत लातूर शहर टी बी युनिट अंतर्गत २०० क्षयरुग्ण दत्तक घेवून त्यांना ६ महिन्यांसाठी आवश्यक १२०० फूडबास्केटचा पुरवठा करणाऱ्या लातूर एमआयडीसी येथील एडीएम ॲग्रो अँड विझाग प्रा. लि. यांचा ना. बनसोडे यांच्या सन्मान करण्यात आला. तसेच लातूर शहर महानगरपालिकेच्या ताफ्यात नव्याने सामील झालेल्या अग्निशमन वाहन, फिरते शौचालये आदीचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.



# मराठवाड्यात लातूर जिल्हा आहे याचा सरकारला विसर–आ. देशमुख

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मोठा गाजावाजा करून छत्रपती संभाजीनगर येथे घेतलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीतून या विभागाची निराशाच झाली आहे, शासनाने जुन्या योजनाच नव्याने जाहीर करून येथील जनतेची दिशाभूल केली आहे. या विभागात लातूर जिल्हा आहे याचा तर सरकारला विसरच पडला आहे, अशी प्रतिक्रीया राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

या संदर्भाने प्रतिक्रीया व्यक्त करतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, बऱ्याच अवकाशानंतर मराठवाड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी, शिक्षण, औद्योगिकीकरण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य या विभागांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन येथील अनुशेष दूर होईल ही अपेक्षा होती मात्र ती फोल ठरली आहे. सततच्या दुष्काळामुळे लातूर, उस्मानाबाद, बीड जिल्ह्यातील कृषी क्षेत्राबरोबरच औद्योगिक प्रगती थंडावली आहे. या पार्श्र्वभूमीवर या जिल्ह्यात पाणी आणण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होणे अपेक्षित होते मात्र मराठवाडा वॉटरग्रीडचा चेंडू पुन्हा केंद्राकडे ढकलून राज्य शासनाने हात झटकले आहेत.

लातूरच्या शैक्षणिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक व पूरक सुविधांची उभारणी, लातूर शहराचा बाह्य वळण रस्ता, एमआयडीसीचा तिसऱ्या टप्प्यातील विस्तार, अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत यासंबंधीच्य घोषणा मंत्रिमंडळ बैठकीनंतर केल्या जातील असे वाटत होते मात्र राज्य सरकारने फक्त मराठवाड्यात येऊन बैठक घेण्याचे सोपस्कार पूर्ण केले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे बैठक होऊनही मराठवाडा विभागाला विशेष असे काही द्यायचचे नव्हते तर ही बैठक घेतली कशासाठी ? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे, असेही आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

# छावा कार्यकर्त्यांनी ना. बनसोडे यांना घरासमोरच अडविले; घोषणाबाजी



लातूर : मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करावा, पीक विमा कंपनीला २५% भरपाई देण्याचे तातडीने आदेश द्यावेत आदी मागण्यासंबंधी घोषणा देत अ. भा. छावा संघटनेने क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांना त्यांच्या लातूर येथील घरासमोरच अडवलं.

राज्य सरकारनं मराठवाड्यात मंत्रिमंडळ बैठक घेऊन तोंडाला पाने पुसली आहेत. अशा घोषणा देत अ. भा. छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे यांच्या नेतृत्वात ना. बनसोडे यांना घरासमोरच अडवलं. ना. बनसोडे हे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणास निघाले असताना छावा कार्यकर्त्यांनी त्यांच्या लातूर येथील 'शकुंतला' निवासस्थानासमोर घोषणाबाजी केली, ठिय्या आंदोलन केले. ना. बनसोडे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. छावा संघटनेने मंत्र्यांना मुक्तीनिमित्त ध्वजारोहण करू देणार नाही असा ईशारा दिला होता. एमआयडीसी पोलिसांना याची खबरच नसावी, त्यामुळे मंत्र्यांच्या घरासमोर काहिवेळ गोधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

